महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ 6741

दि 5/०२/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
अमरावती विभाग अमरावती

**विषय** :- शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विदयार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणा-या संस्थांची निवड करणेबाबत..

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-७/४६९,दि.३/०१/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विदयार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणा-या संस्थांची निवड करणेबाबतचे पत्र व नव्याने समावेश केलेल्या ०४ संस्थांची यादी सोबत जोडलेली आहे,सदर बाब आपल्या स्तरावर शिक्षक, विदयार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

S.Salunke 05.02.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा. सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र :-**

१) रा.म.पुणे यांचे पत्र

१) कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे क्रं संकीर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२दि.०३/०२/२०२६ रोजीचे पत्र.

**प्रतिलिपी :-**

१.मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२.मा. विभागीय उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.
३.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं/परीक्षा-७/४६९
पुणे ४११००४
दिनांक ०३/०१/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय - शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणाऱ्या संस्थांची निवड करणेबाबत**

**संदर्भ -- १)शासनाचे जा.क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १४/०१/२०२६ रोजीचे पत्र**
**२)या कायालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-७/२९५ दि.२३/०१/२०२६रोजीचे पत्र**
**३)शासनाचे जा. क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक ०३/०२/२०२६ रोजीचे पत्र**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२, दि.२४ नोव्हेंबर २०१७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ चे पत्रान्वये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याच्या प्रयोजनार्थ पात्र अशा एकूण ५९ संस्थांची यादी शिफारस करून शासनास सादर केली आहे.

संदर्भिय पत्र क्र.१ नुसार ५९ पात्र संस्थांपैकी सद्यस्थितीत ४१ संस्थांना शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे सादर करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित संस्थांच्या तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर नवीन संस्थांची यादी स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल असे कळविले होते. सदर बाब संदर्भ क्र. २ नुसार विभागीय मंडळास कळविली आहे.

**याबाबत संदर्भ क्र.३ च्या पत्रानुसार शासनाकडून ४१ संस्थांच्या यादीमध्ये नव्याने ०४ संस्थांचा समावेश केला आहे सदर ०४ संस्थांची यादी यासोबत पुढील उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.** सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, विद्यार्थी तसेच सर्व संबंधित घटकांना लिखित स्वरूपात अवगत करून देण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे.

<u>प्रत माहितीसाठी</u>

१. मा.कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी</u>

गणकयंत्र व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

[redacted]

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

ईमेल- sd२.sesd-mh@mah.gov.in

---

क्रमांक: संकीर्ण-३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक :-०३ फेब्रुवारी,२०२६

प्रति,

१. संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्राशिक्षण परिषद, पुणे.

२. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ,पुणे.

**विषय :-** शास्त्रिय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणा-या संस्थांची निवड करणे बाबत.

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण विभागाचे दिनांक: २४ नोव्हेंबर २०१७ चे पत्र.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक ३१ डिसेंबर २०२५ चे पत्र.
३) शालेय शिक्षण विभागाचे दिनांक: १४.०१.२०२६ चे पत्र.

महोदय,

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रासोबतच कला, चित्रकला, शास्त्रियनृत्य, लोककला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचा उपयोग त्यांच्या भविष्याच्या प्रगतीपटासाठी होण्यासाठी, तसेच लोककला हे समाज प्रबोधनाचे माध्यम असल्याने लोककलेची वाढ व संवर्धन करण्याचे काम अनेक शालेय विद्यार्थी करीत असतात अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेमध्ये क्रीडा गुणांच्या धर्तीवर शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

२. संदर्भ क्रमांक २ मधील पत्रान्वये संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिपद, पुणे यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याच्या प्रयोजनार्थ पात्र अशा एकूण ५९ संस्थांची यादी शिफारस करुन शासनास सादर करण्यात आली होती.

३. संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये ४१ संस्थांना शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे सादर करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच अर्वरीत संस्थांना त्रुटीपुर्तता करण्यास कळविण्यात आहे होते. उर्वरित

संस्थापैकी ४ संस्थानी त्रुटींची पुर्तता केली आहे (संस्थाची यादी सोबत जोडली आहे.) अश्या मान्यता प्राप्त ४१ संस्थांच्या यादीमध्ये उपरोक्त ४ संस्थांचा समावेश करण्यातस शासन मान्यता देण्यात येत आहे तरी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी सदर निर्णयाच्या अनुषंगाने तात्काळ आपल्या स्तरावरुन आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करुण प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होईल.

Digitally signed by
Tushar Vasantrao Mahajan
Date: 03-02-2026
12:05:30

(तुषार महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**सोबत :- वरिल प्रमाणे.**

# पात्र संस्था यादी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता | संस्थेचा फोन नंबर | संस्थेचा e-mail Id |
|---|---|---|---|---|
| १ | मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळ | मु.पो.येडशी ता.जि. धाराशिव | ८२७५२७१८९५ | mahadevsaste९@gmail.com |
| २ | जय शिव बहुउदेशिय शिक्षण मंडळ | विद्यावर्धिनी विदयालय अहमदपूर जि. लातूर 413515 | ९४२२४७०६७० | vidyavskul२०१६@gmail.com |
| ३ | श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज प्रतिष्ठान | शिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड. | ८८८८४०२०५२ | vedantpawal@gmail.com |
| ४ | डॉ.कुमार गंधर्व संगीत प्रसारक मंडळ, लातूर. | विठ्ठल नगर ब, प्रकाश नगर प., लातूर ता.जि. लातूर पिन 413512. | ९७६५५०६८०३ | laturdrkumargandharva@gmail.com |